महा मेट्रो
PUNE METRO

## पीसीएमसी ते निगडी मेट्रो मार्गाला महाराष्ट्र शासनाची मंजुरी

पुणे-पिंपरी चिंचवड चा महाराष्ट्रातील मोठ्या नागरी समुहात समावेश होतो. विविध उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील वाढीमुळे गेल्या दोन दशकात शहरात लोकसंख्या आणि रोजगारामध्ये प्रचंड वाढ झाली आहे. गेल्या काही दशकात पिंपरी चिंचवड परिसरात शहरीकरणात वेगाने वाढ होत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, पीसीएमसीची लोकसंख्या १७.२७ लाख होती आणि २०१७ पर्यंत लोकसंख्या २१ लाख होऊन २०२८ आणि २०३८ या वर्षातील लोकसंख्या अनुक्रमे ३०.९ लाख आणि ३९.१लाख होण्याचा अंदाज आहे.

सध्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड कॉरिडोर-1 म्हणजेच पीसीएमसी ते स्वारगेट (१६.५९८ किमी) मेट्रो मार्गिकेच्या बांधकाम करीत आहे. त्यापैकी पी.सी.एम.सी. पासून रेंजहिल पर्यंत डिसेंबर २०१९ पर्यंत मेट्रो कार्यान्वित करण्यात येणारअसून रेंजहिल - स्वारगेट नोव्हेंबर २०२१ पर्यंत कार्यान्वित करण्याचा मानस आहे. पी.सी.एम.सी. ते निगडी या मार्गाच्या विस्तारासाठी सर्वसामान्य नागरीक, निर्वाचित प्रतिनिधी, तसेच इतर भागधारांकडून मागण्या प्राप्त झाल्या होत्या.

पुणे महानगर क्षेत्र विकास प्रधिकरण यांनी तयार केलेल्या Comprehensive Mobility Plan (Sept. 2018) मध्ये नमुद / शिफारस केल्याप्रमाणे सद्यस्थितीत मेट्रो मार्गिकेचा विस्तार निगडी पर्यंत करणे गरजेचे आहे. त्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्प. लि. द्वारे M/s. SYSTRA-AECOM-EGIS-RITES (कन्सोंटियम) यांचाकडून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून घेण्यात आला असून त्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे डिसेंबर २०१८ मध्ये मंजुरी

मिळाली आहे. त्यानंतर महाराष्ट्र राज्यशासनाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता . आज दि . २७.०२.२०१९ रोजी महाराष्ट्र शासनाने पीसीएमसी ते निगडी मेट्रो मार्गाला मंजुरी दिली आहे . या मार्गिकेची वैशिष्ट्ये खाली नमूद केली आहेत .: -

१. मार्गिकेचा तपशिल: -

| मार्गिका | उन्नत | भूमिगत | एकूण लांबी |
|---|---|---|---|
| पी.सी.एम.सी. ते निगडी (भक्ति शक्ति चौक) | ४.४१३ | ० | ४.४१३ |

२. स्थानकांची संख्या: -

| मार्गिका | उन्नत स्थानके | भूमिगत स्थानके | एकूण |
|---|---|---|---|
| पी.सी.एम.सी. ते निगडी (भक्ति शक्ति चौक) | ३ चिंचवड , आकुर्डी, निगडी | ० | ३ |

३. प्रवासी संख्येचे अनुमान: -

| वर्ष | कमाल PHPDT | दैनिक प्रवासी (लक्ष) |
|---|---|---|
| २०२३ | १४,४५० | ४.९५ |
| २०३३ | १९,४८० | ६.७७ |
| २०४३ | २३,६९० | ८.०२ |
| २०५३ | २५,६०० | ८.६७ |

४. अनुमानित खर्च: -

| घटक | **२०१८-२०१९ च्या किमतीनुसार एकूण खर्च (कोटी)** |
|---|---|
| सिव्हिल वर्क [व्हायडक्ट + स्थानके + पादचारी पूल + लिफ्ट व एस्केलेटर्स + Intermodal Integration आणि Platform Screen Doors (PSD)] | ४०५.८३ |
| सिस्टम आणि ट्रॅक (ट्रॅक्शन, ओएचई (OHE),एएसएस (ASS), सिग्नलिंग, दूरसंचार, रोलिंग स्टॉक, ट्रॅक इ.) | ३४५.७३ |
| जमीन, पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) आणि युटिलीटीज. | १८४.०९ |
| डिझाईन आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार. | ५१.८५ |
| डेपो + पार्किंग (अतिरीक्त ३ कारच्या १२ गाड्यांसाठी) | ४२.२० |
| आकस्मिकता | १८.५२ |
| **एकूण** | **१०४८.२२** |

५. प्रकल्प उभारणीसाठी खालील प्रमाणे आर्थिक उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे: -

| **तपशील** | **रक्कम (कोटी)** | **% हिस्सा** |
|---|---|---|
| सॉफ्ट लोन द्विपक्षीय / बहुपक्षीय निधी एजन्सी कडून | ५१८ | ४९.४२६ |
| समभाग भारत सरकार | १२२ | ११.६२६ |
| समभाग पीसीएमसी (PCMC) | १२२ | ११.६२६ |
| जमीन, पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA), पुनर्वसन/ पुनर्वास (R&R) पीसीएमसी (PCMC) | १८५ | १७.६४२ |

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र सरकारकडून राज्य कर SGST साठी एसडी (SD) | ५१ | ४.५५ |
| भारत सरकारद्वारे केंद्रीय कर CGST साठी एसडी (SD) | ५१ | ४.५५ |
| **एकूण किंमत** | **१०४८** | **१००.००** |
| इतर इक्विटी Deferred Revenue (स्थावर मिळकत विकासातून) | १५५ | |

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ . ब्रिजेश दीक्षित यांनी सांगितले की पीसीएमसी ते निगडी या विस्तारीत मेट्रो मार्गाची नितांत  गरज आहे व यामुळे निगडी ( भक्ती शक्ती चौक ) थेट स्वारगेट , मंडई , फडके हौद , शिवाजी नगर , सिविल कोर्ट या भागांशी जोडला जाईल . मेट्रोचा पूर्व - पश्चिम मार्गिका जी पीसीएमसी  ते स्वारगेट अशी बनविण्यात येत आहे , आता या विस्तारामुळे पुणे पिंपरी चिंचवड महानगरच्या पश्चिमेकडील दाट वस्ती असलेल्या सर्व भागांना जोडण्याचे काम होईल .या प्रसंगी पीसीएमसी आयुक्त श्री . श्रावण हर्डीकर यांनी आनंद व्यक्त केला व सांगितले की यामुळे पिंपरी चिंचवड परिसरातील सर्व दाट लोकवस्ती असलेले भाग मेट्रो मुळे जोडले जातील . या विस्तारामुळे एक प्रभावी शहरी वाहतूक व्यवस्था निगडी , पिंपरी चिंचवड कराना मिळणार असून , या भागातील वाहतूक सुरळीत व्हायला खूप मदत होणार आहे . या बरोबरच पीसीएमसी  ते स्वारगेट या मेट्रो मार्गिकेची प्रवासी वाहतूक देखील वाढणार आहे .